http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 5, May 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# मर्ढेकरांची कविता : काही प्रतिमा



**प्रा.डॉ.खंदारे बी.बी.**
विभाग प्रमुख, मराठी
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत जि.हिंगोली

## RESEARCH PAPER

आधुनिक काव्याच्या इतिहासात केशवसूतांनंतर वाङ:मयाच्या इतिहासात नवकवितेचे प्रवर्तक म्हणून ज्यांचा विचार केला गेला असा प्रज्ञा-प्रतिभावंत कवी म्हणजे मर्ढेकर होत. मर्ढेकर सुर्वे ढसाळ अशा तीन कवीची कविताच खऱ्या अर्थांने कालसंगत जीवन -जाणिवेची कविता म्हणून विचारात घ्यावी लागते. पण पैकी सुर्वे आणि ढसाळ स्वातंत्र्योतर काळातील कवी होत त्यांचा विचार त्या काळाच्या पार्श्वभूमिवर करण गरजेचे ठरते, इथे अप्रस्तुत ठरणारे आहे, परंतु महान प्रतिभावंतांच्या प्रतिभा ज्ञानाचा विचार केल्यास एखादाच असा कवी असतो की त्यालाच म्हणून की काय त्याच्या अवतीभोवतीच्या मानवी सहजीवनांचे सम्यक आणि सजग भान आलेले असते.

त्याला मर्ढेकर आत्मनिष्ठ जाणीव असे म्हणतात अशा आत्मनिष्ठ जाणिवेचा कवी म्हणून मर्ढेकर हा कवी नवकाव्याच प्रवर्तक म्हणून ठरला

 ©EIJMR All rights reserved.

आहे.त्यांचे हे नवप्रवर्तन नवकाव्याचा अन्वर्थकतेतून आलेले असते हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही काळ बदलला की परिस्थिती बदलते अन् परिस्थिती बदलली की मूल्यदृष्टीही बदलत असते मूल्यदृष्टी बदलली की प्रश्न पडत असतात या प्रश्नाच्या सोडणूकीसाठी प्रज्ञा-प्रतिभावंताचा ऊर्जा आपआपल्या प्रतिभाधर्माप्रमाणे कार्यरत असते. त्या काळाच्या पार्श्वभूमीवरील सर्व संदर्भाची विचार करुनच त्या, त्या काळातील कविंच्या काव्याचे स्वरुप आकलन करुन घ्यावे लागते.

मर्ढेकर हा कवी अशा काळात काव्यलेखन करतांना करतात की जो काळ माणवी जीवनाच्या अस्तित्वाची असहाय्यता घेवून आला आहे. शिशिरागमधील कविता सोडली तर काही कविता मधून जी जीवन जाणीव आली आहे ती त्या समाज जीवनाची वास्तवता शब्दांकित करणारी आहे पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दाने मानवी जीवनाची भयानक वाताहात केली त्या वाताहातीच्या आंर्तबाह्य स्वरुपाची वास्तवता अभिव्यक्त करणारी आहे.

मर्ढेकर हा कवी तसा कमालीचा संवेदनशील ज्यांचे मानवी जीवनाच्या अस्तित्वावर अपार प्रेम आहे. अनं एक सूस्थीत मानवीमुल्यांवर अधारीत निष्ठा ठेवून जीवन जगू पाहत असलेल्या सश्रध्द मानवी जीवनाचे भयान तांडव पाहूनविकल अंतविपनन अवस्थेने निरुपीकरण पाहून मर्ढेकरांसारख्या कवींचे ऱ्हदयद्रावक घटना पाहून दु:खाचे कढ पिण्याशिवाय दुसरे काहीच हातचे जेव्हा राहत नाही तेव्हा मानवी अस्तित्वाचे काय? या प्रश्नाचे समग्रलक्ष्मी मानवी अस्तित्वाची जाणिव त्यांच्या कवितेतून प्रकट होतांना दिसते.

'' डोळयांच्याच भीती झाल्या ऐशा ही अवस्था माणवी समाजाची झालेली दिसते. अशाही परिस्थितीत मणूस आणि मानवी जीवनाचे अस्तित्व टिकले, अबांधित राहिले पाहिजे असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. ही त्यांची स्वाभाविक समाज वास्तवाभिमुक्तता त्यांची कवितेचे प्रमुख आहे. वैशिष्टये आहे.

'ही एक मुंगी ती एक मुंगी
पिपात मेल्या उंदिर'

मानवी जीवनाची झालेली पडझड विकलांगता विराणता अगतिकता अन् सर्वात मोठी म्हणजे माणसांचा मानवी जीवनावरचा जगण्यावरलाच उडालेला

 ©EIJMR All rights reserved.

विश्वास ढासहणारी मानवी जीवनमूल्याच्या सर्वक्रिया प्रतिकात्मक वास्तव मर्ढेकरांच्या पुढयात उभे टाकलेले असतांना या कविती प्रज्ञाप्रतिभा केवळ अन्वयार्थ लावत बसत नाही, तर त्यांना जाणवणाऱ्या मानवी जीवनाच्या प्रेमाबद्दल अस्तित्वाबदल त्या जीवन जाणीवे उघडे नागडे रुप जीवनद्ष्टीला जाणवले ते त्यांनी त्या समाजवास्तवाच्या परिभाषेत व्यक्त केले.

माणवावर अपारप्रेम करणारा माणुस माणवाची असी झालेली भयान वास्तवता बघून डोळे भिजून जाणार नाहीतर काय 'डोळयांच्याच झाल्या भिती ऐशा असे म्हणतो.

मर्ढेकरांच्य सर्व कविताचाच जर आपण साकल्याने अभ्यास केला तर अस दिसते की मध्ययुगीन काळात तुकारामांच्यां अनुभूतीला जे जाणवले आहे तेच बदलल्या काळात म्हणुन ते म्हणतात की

' तुझ्यासाठी देवा काय म्या झुरावे |
झुरळाते कॅसे पतं गावे.'

या कवितेतली 'झुरळ' ही प्रतिमा तुकारामांच्या इथे पाहिजे जातिचे ऐरा गबाळयाचे काम नोव्हे' या उपाधीला पोहचलेल्या सश्रध्द मनाची आहे.

'कढई' ही प्रतिमा मर्ढेकरांनी 'या दुखाच्या कढईत गा' या कवितेत आलेली आहे, ही प्रतिमाही साधर्म्ययुक्त अशा समाज जीवनाच्या वास्तवाची अन्वर्थकता प्रकट करणारी आहे. मानवी जीवन जसे दुसऱ्या महायुध्दाने अग्नीकुंड पेटलेला आहे अन त्यावर मानवी जीवनाचे अस्तित्व जवळ आहे यातून परात्मत्वाची जाणीव व्यक्त होतेच परंतु एका सश्रध्द मनान मानवी जीवनाच्या अस्तित्वाबदलचा बदलचा दुर्दम्या आशावर व्यक्त होतांनाही जाणवतो.

'कढई' आगीच्या भट्टीवर जशी जळत जाते पण जळुनही आपले आपले कणखर अन मजबूत अस्तित्व  शिल्लक ठेवते तसेच काहीसे माणवी जीवनाच्या अस्तित्वाचे असावे हा सश्रध्दभाव साधर्म्ययुक्त जीवनानुभव 'कढई' या प्रतिमेमधून प्रतिमांकीत झाला आहे. 'पक्चरली जरी रात्रदिव्यानी | तरी पंपती कुणी काळोख' आशावाद व्यक्त होतो.

 ©EIJMR All rights reserved.

'दवात आलीस भल्या पहाटे, न्हालेल्या गर्भवतीसम, थांब उद्याचे माऊले तीर्थ पायीचे घेईते' अशा किती तरी ओळीमधून आशावादी जीवनाच्या जाणिवा मर्ढेकरांनी व्यक्त केल्या यावरुन या कवीचे मानवी जीवनावर कीती कमालीचे प्रेम होते हे जाणवते. याबरोबरच मानवी जीवनमूल्यांवरनिष्ठा बाळगणारा अन् त्या जीवन मुल्यांची पडझड पाहूण आवाक झालेले कवीचे व्यक्तीमन हे सतत त्यांच्या कवीतेतून जाणवत राहते.

'मर्ढेकर जीवनातील मूलभूत प्रश्नांना उत्करतेने समोरे जातात. त्यामूळे त्यांचे विचार वा दृष्टीकोण मान्य नसणाऱ्यालाही त्यांच्या अनुभवाचा सच्चेपणा व उत्कट प्रखरता नाकारता येत नाही. हीच त्यांच्या काव्याची शक्ती आहे'' (पू.क्र341 म.कविता आणि विवेचन)

दवान आलीस भल्या पहाटे
अन्
कालपरवा, पोरसवदा होतीस तू
थांब उद्याचे माऊले तीर्थ पाईचे घेईतो.

' या कवितेतून व्यक्त होणारी भावसंवेदना अनेकांनी 'स्त्री' समजून व्यक्त केली आहे साधर्म्य सृजनात्मकतेच्या दृष्टीने असू शकेल परंतु मर्ढेकरांना अपक्षित असणारी जाणिव ही केवळ एका स्त्री जीवनाची अनुभूती व्यक्त करणारी नसावी. असेच वाटत राहते. आपण त्यांच्या अवतीभोवतीचे कालसंदर्भ जर लक्षात घेतले तर हे आपल्या लक्षात येईल की मर्ढेकर हा कवी एकाच वेळी भूत वर्तमान आणि भविष्य या काळाशी संवादी राहीलेले आहेत. कारण दुसऱ्या महायुध्दाने मानवी जीवनाची झालेली वाताहात पाहून अवस्था व त्यातुन हि उठण्याची अगितकता हे सारे संदर्भ मर्ढेकरांच्या संवेदनशीलतेला अस्वस्थ करणारे आहेत.आणि त्यामुळेच त्यांची ही जाणीव केवळ स्त्री जीवनाच्या अवस्थांतराची नसून ती अखिल मानवी जीवनाच्या अस्तित्व जाणीवेची आहे कारण त्यांना मानवी जीवनाच्या पडझडीची अतिशय सजग जाण आहे कारण त्यांची मानवी जीवनावर त्यांच्या संस्कृतीवर प्रगाढ विश्वास आहे. स्थिरता अन अस्थिरता ह्या सृष्टीच्या कालचक्राशी संबंधीत बाबी आहेत त्यातुनही मानवी संस्कृती उभी राहु शकते पडझड चालुच राहु शकते.

 ©EIJMR All rights reserved.

हानियतीशरणात्मक व्दव्दस्मक कालसंवादी तरतमभाव ‘कालपरवा पोरसवादा होलेस तु थांब उद्‌याचे पाऊले तीर्थ पाईले घेईतो’ असा भाव व्यक्त होता.

सृष्टीच्या कालचक्रांला काळाचे बंधन हतबल ठरतात ह्या मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत सृष्टीचा ‘ कार्यकारणभाव’ लक्षात घेतल्यामुळे मर्ढेकर आशावादी जीवन जाणिवेची भाव संवेदना व्यक्त करतात.

‘माणूस नियतीच्या हातचे बाहुले आहे’

या त्यांच्या जाणिवेने मानवी जीवनाचे वास्तव समजुन घेतल्यामुळेच की कायनिसर्गाच्या कालचक्राला विनम्र होऊन थांब उद्‌याचे माऊले असे संबोधतात हे एका अर्थाने जीवनाला समजून घेणारी जाणीव आहे. सृष्टीच्या सृजनात्मक महानतेच मोठेपण मान्य करणारी तिच्या विषयीचा विनम्र भाव व्यक्त करणारी जाणिव वरिल प्रतिमेमधून प्रकट होतांना जाणवत राहते.

## संदर्भ

1.मर्ढेकरांची काव्यशैली - डॉ.सुरेश भृगुवार (पु.क्र.51)

2. मर्ढेकरांची कविता - मौज प्रकाशन (पु.क्र.45)